दैनिक पुढारी, ११ फेब्रुवारी २००३, पान तीन

# वेदना व जखमेची वाटच मला भावते : सिंधुताई सपकाळ

**कोल्हापूर** : हजार मुलांची आई म्हणवून घेण्यात मला धन्यता वाटते. जखमांची व वेदनांची वाट मला भावते, असे मनोगत ज्येष्ठ समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांनी व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा भद्रकाली ताराराणी पुरस्कार पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते सिंधूताई सपकाळ यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या या पुरस्कार प्रदान कार्यक्रमासाठी ताराराणी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांशी संवाद साधण्यासाठी उभ्या राहिलेल्या सिंधूताईंनी प्रथम आपल्या साधेपणाची कबुली देत आयुष्यातील खडतर प्रवास कथन केला. आज मी हजार मुलांची आई आहे, हे सांगताना मला धन्यता वाटते. असे सांगून त्या म्हणाल्या, असंख्य समस्यांना तोंड देताना जगण्याचे गणित मला उमगले. स्वत:चे दु:ख इतरांच्यात पाहिल्यावर त्यांचा आधार बनण्यासाठी पुढे सरसावलेले माझे हात त्यांच्या मायेच्या बंधनात अडकले. महिलांनी प्रगतीची पावले टाकताना स्वत:ला विसरून चालणार नाही. त्यांनी जागृत राहून आपल्या वाटचालीला गती दिली पाहिजे. नवीन पिढीला संस्कृतीचा वारसा देताना आपण चुकलो. असे सांगून त्या म्हणाल्या, संस्कृतीतील काही मूल्य माणसाच्या जडणघडणीत विधायक बदल घडवून आणतात. पण हीच मूल्य रुजविण्यात आपण चुकलो. नवीन व जुन्याचा संगम साधताना आपण कमी पडलो. आजपर्यंतच्या आयुष्यात शत्रू जितके भेटले त्याहून अधिक मदतीचा हात देणारेही भेटले, असे त्या म्हणाल्या.

मला पुरस्कार खूप मिळाले पण माझ्या घरातील अनाथ मुलांना काही वेळा एक वेळचे पुरेसे अन्नही मिळत नाही. मी त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्यात कमी पडते. यावेळी तेच मला आधार देतात त्यांचा हा आधार मला समस्यांना तोंड देण्यास बळ देतो. घरापासून पोरकी झाल्यावर दिशाहीन आयुष्य जगताना या असंख्य जीवांनी मला आधार दिला. आमच्यात एक भावनिक नातं निर्माण झालं. समाजानं आम्हाला सहानुभूतीच्या नजरेने पाहू नये; कारण प्रत्येकाने स्वाभिमानी असावे असे मला वाटते. म्हणूनच ज़खमांची, वेदनांची वाट मला सदैव भावली, असे त्या म्हणाल्या. डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, समाजात सर्वस्वाची होळी करून केवळ इतरांसाठी आयुष्य वेचणारी मंडळी कमी असतात. त्यातीलच एक सिंधूताई आहेत. आपण स्वार्थाच्या जाळ्यात इतके अडकलो आहोत की इतरांकडे दुर्लक्ष करतो. भरपूर संपत्ती मिळवूनही शेवटी मी काय मिळवले, असा प्रश्न धनवंताला पडत असेल तर त्याची संपत्ती मातीमोलाची ठरते. यावेळी व्यासपीठावर सौ. राजलक्ष्मी जाधव, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, उत्तमराव काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन जयश्री पाटील, अरुण कणंगलेकर यांनी केले. प्रास्ताविक शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांनी केले. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी गौरवपत्राचे वाचन केले. श्रीमती यू. डी. इंदूलकर यांनी आभार मानले.



*ताराराणी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा भद्रकाली ताराराणी पुरस्कार पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्याहस्ते सिंधूताई सपकाळ यांना प्रदान करण्यात आला. यावेळी छायाचित्रात डावीकडून उत्तमराव काळे, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, सौ. राजलक्ष्मी जाधव. (छाया : तय्यब अली)*